आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१६ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- दिवाळीच्या काळात पक्ष, इच्छुक किंवा उमेदवारांकडून दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंवर काटेकोर लक्ष ठेवणार असल्याचा निवडणूक आयोगाचा इशारा
- भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीची आज नवी दिल्लीत बैठक, महाविकास आघाडीत २२४ जागांवर सहमती
- महायुती सरकारमुळे विकासाला गती मिळाल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन/ तर सरकारचे दावे खोटे असल्याचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा आरोप
- अनुसूचित जातींसाठीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी स्थापन केलेल्या समितीला वंचित बहुजन आघाडीचा विरोध

**आणि**

- 2025-26 च्या हंगामासाठी रबी पिकांच्या किमान आधारभूत दरात, तसंच केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

**<><><><><>**

दिवाळीच्या काळात पक्ष, इच्छुक किंवा उमेदवारांकडून दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंवर आयोगाचं आणि पोलिसांचं काटेकोर लक्ष असणार आहे. यासंदर्भात सर्वसामान्य नागरिक C-VIGIL ॲपवर तक्रार नोंदवू शकतात, अशी माहिती अतिरीक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांनी दिली. मुंबईत आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.  निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्यात काल काही शासन आदेश जारी झाले असतील किंवा काही जाहिराती प्रसिद्ध झाल्या असतील त्यांची चौकशी करू असंही कुलकर्णी म्हणाले.

या निवडणुकीत उमेदवाराला कमाल ४० लाख रुपये खर्च करता येईल. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर खर्चाची मोजणी सुरू होईल पण अर्ज भरण्यापूर्वी काही प्रचारसाहित्य खरेदी केलं असेल तर त्याचा खर्चही यात धरला जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा राज्यात ६९ लाखांहून_अधिक मतदार वाढले आहेत. तसंच मतदान केंद्रांची संख्या साडे ३ हजारांनी वाढल्याचं ते म्हणाले. ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यंगत्व आणि ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना अर्ज भरुन दिल्यावर घरुन मतदानाची सोय मिळेल, असं त्यांनी सांगितलं. मुंबई, पुणे, ठाण्यात गृहनिर्माण संस्थांमध्ये १ हजार १८१ आणि झोपडपट्टीत २१० मतदान केंद्र उभारली आहेत. या निवडणुकीसाठी ६ लाख कर्मचारी आणि पुरेशी सुरक्षा व्यवस्था तैनात केली जाणार आहे.

<><><><><>

मतदान केंद्रांची माहिती घरबसल्या मिळावी यासाठी मुंबईतल्या मतदारांना घरपोच पत्र दिली जात आहेत. त्यात दिलेला QR कोड स्कॅन केला की मतदारांना

मतदान केंद्रांपर्यंत पोहोचण्याचा नकाशा मिळेल, अशी माहिती मुंबईचे जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिली. लोकसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेदरम्यान मुंबईतल्या काही मतदान केंद्रांमध्ये लागलेल्या रांगा आणि मतदारांची झालेली गैरसोय लक्षात घेऊन मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात आल्याची, तसंच एका मतदान केंद्राच्या ठिकाणी १० पेक्षा जास्त केंद्रं असल्यास ही केंद्रं जवळच्या ठिकाणी हलवण्यात आली असल्याचंही त्यांनी सांगितलं. मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी विविध प्रयत्न सुरू असल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय

अध्यक्ष जे. पी. नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते यात सहभागी होणार आहेत. यावेळी उमेदवार यादीवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

महाविकास आघाडीत २८८ पैकी २२४ जागांवर सहमती झाली आहे. उद्या उर्वरित जागांवर सहमती होईल, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. नवी दिल्लीत पक्षाच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. आज ८४ जागांच्या उमेदवारांबाबत चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्रात काल विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर आता सर्वच पक्षांमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. सत्ताधारी महायुतीनं आज सरकारच्या आजपर्यंतच्या कामांचा आढावा घेणारं प्रगती पुस्तक प्रकाशित केलं.

महाविकास आघाडीने अडीच वर्षांत अनेक प्रकल्पांमध्ये अडथळे आणले. पण, महायुतीचं सरकार आल्यानंतर विकासाला गती मिळाली, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत आज महायुतीची संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, खासदार सुनील तटकरे हे देखील उपस्थित होते. महायुती सरकारच्या कामाचा आढावा घेणारं काम हीच आमची ओळख हे रिपोर्ट कार्ड या पत्रकार परिषदेत प्रकाशित करण्यात आलं.

महाराष्ट्रात परिवर्तन करणाऱ्या योजना महायुती सरकारनं केल्या. शेती, शिक्षण, नदीजोड तसंच सिंचन प्रकल्प, विविध प्रशासकीय घटकांसाठी दिलासा अशा योजना महायुती सरकारने आणल्या, असं देवेंद्र फडनवीस म्हणाले.

महायुती सरकारनं फार विचारपूर्वक योजना जाहीर केल्या. सर्व घटकांना या योजनांच्या माध्यमातून लाभ देण्याचा प्रयत्न सरकारने केला. त्याचा लेखाजोखा रिपोर्ट कार्डात आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**<><><><><>**

मागच्या दोन वर्षांत महाराष्ट्राची इतर राज्यांच्या तुलनेत पिछेहाट झाली असून सरकारने वार्ताहर परिषदेत केलेले सर्व दावे खोटे असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे. राज्यात होऊ घातलेले प्रकल्प गुजरात आणि इतर राज्यात गेले, राज्यात बेरोजगारी वाढली, मुंबईतल्या मोक्याच्या जागेवरल्या जमिनी उद्योगपतींना देण्यात आल्या, कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आली असा आरोप नाना पटोले यांनी केला. राज्यावर ९ लाख कोटी रुपयांचं कर्ज आहे, असंही पटोले म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या महायुती सरकारनं अनुसूचित जातींसाठीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी स्थापन केलेल्या समितीला वंचित बहुजन आघाडीनं विरोध केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते ऍड. प्रकाश आंबेडकर यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही भूमिका मांडली. राज्य सरकारनं काल अध्यादेश काढून यासाठी निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. मागासवर्गीयांचं आरक्षण निकामी करण्याच्या उद्देशानंच हा अध्यादेश महाविकास आघाडीतल्या घटक पक्षाच्या संमतीनं काढला असल्याचा आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा ‘रणांगण विधानसभेचे’ हा कार्यक्रम उद्या  गुरुवार, १७ ऑक्टोबरपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त

विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. उद्या या कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

2025-26 च्या पणन हंगामासाठी रबी पिकांच्या किमान आधारभूत दरात वाढ करण्याचा निर्णय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. यात गव्हाच्या किमान आधारभूत दरात दीडशे रुपये वाढ केल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. तसंच बाजरी १३० रुपये, ज्वारीत १३०, हरभरा २१०, मसूर २७५, मोहरी ३००, आणि सूर्यफूलाच्या किमान आधारभूत दरात १४० रुपये वाढ करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी हा निर्णय घेतल्याचं यावेळी वैष्णव यांनी सांगितलं.

**केंद्रीय सरकारी कर्मचारी** आणि निवृत्ती वेतनधारक महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्यात आली आहे. आता हा महागाई भत्ता ५३ टक्के होईल. याचा लाभ ४९ लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६४ लाख निवृत्ती वेतनाधारकांना होणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेचा आज सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर इथं समारोप झाला. शिवनेरी किल्ल्यापासून सुरु झालेल्या या यात्रेने १९ जिल्ह्यातून ७ हजार ३६५ किलोमीटरचा प्रवास केला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षातर्फे व्याहाड ते मोवाड यात्रा काढणार असल्याची माहिती माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी नागपूरमध्ये वार्ताहर परिषदेत दिली. भाजपा प्रणित सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे जनता हैराण झाली आहे. महागाईमुळे सामान्य जनता ही त्रस्त झाली आहे, असा आरोप देशमुख यांनी केला.

<><><><>

मुंबईच्या ओशिवरा भागात आज एका इमारतीतल्या घराला लागलेल्या आगीत तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका वृद्ध दांपत्याचा आणि त्यांच्या मदतनीसाचा समावेश आहे. ओशिवरा इथल्या रिया पॅलेस या इमारतीत दहाव्या मजल्यावर सकाळी साडे आठच्या सुमाराला आग लागली. आगीच्या धुरामुळे गुदमरून चंद्रप्रकाश सोनी, ममता सोनी आणि त्यांचा मदतनीस पेलू बेटा यांचा मृत्यू झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली असून या आगीचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

<><><><>

भंडारा जिल्ह्यात तुमसरच्या खापा टोली परिसरात वाळूच्या टिप्परनं दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर टिप्पर चालक फरार झाला आहे.

<><><><>

सिंधुदुर्ग पोलिसांनी आज दुपारी १० लाख रुपयांची रोकड जप्त केली. फोंडाघाट चेक पोस्टवर कोल्हापूरकडे जाणाऱ्या वाहनातून पोलिसांनी ही रक्कम जप्त केली. प्राथमिक माहितीनुसार ही रक्कम कोल्हापूरमधल्या व्यापाऱ्याची असल्याचे कळते.

<><><><>

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथली तुळजाभवानी देवी दसऱ्याच्या सीमोल्लंघनानंतरची श्रमनिद्रा पूर्ण करून अश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागरी पौर्णिमेला पुन्हा सिंहासनारूढ होते. यानिमित्त लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी पायी येत असतात. त्यामुळे आज आणि उद्या तुळजापूर मार्गावरील वाहतुक वळवण्यात आली आहे.

<><><><>

गेल्या दोन तीन दिवसांपासून रत्नागिरीत विजांच्या कडकटाडासह मुसळधार पाऊस पडत असून त्यामुळे कापणीला आलेल्या भातशेतीचं नुकसान झालं आहे. गेल्या ३६ तासांत खेड इथे ५५ मिलिमीटर, दापोलीत ४१ मिलीमीटर, संगमेश्वर आणि चिपळूणमध्ये ३५ मिलीमीटर अशा पावसाची नोंद झाली आहे.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढच्या ३ दिवसांत तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तसंच, विदर्भात अनेक ठिकाणी सरासरीच्या तुलनेत अधिक तापमानाची नोंद झाली असून मध्य महाराष्ट्रात मात्र तुरळक ठिकाणी तापमानात घट झाल्याची नोंद हवामान विभागानं केली आहे.